**सुविचार**
सर्वात मोठे यश हे सर्वात मोठ्या निराशेनंतरच मिळते.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



युवराज सिंगच्या बायोपिकमध्ये करणार फातिमा सना शेख ही महत्वाची भूमिका!
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 40 ■ सोमवार, दि. 16 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# उपऱ्या उमेदवारांना लागले आमदारकीचे डोहाळे

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : स्थानिक राजकारणाशी कोणताही संबंध नसताना तसेच मतदार संघातील समस्याची कोणतीही माहिती नसताना केवळ पैशाच्या जोरावर आमदार होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या मतदारसंघाबाहेरील उपर्यांना आता आमदारकीचे डोहाळे लागणे सुरू झाले आहे. मात्र पाच वर्ष तोंड न दिसलेला उमेदवार मतदार स्वीकारतील का असा प्रश्न या इच्छुक उपऱ्या उमेदवारांच्या पोस्टरबाजीवरून उपस्थित होत आहे.**






मतदार संघात शेकडो समस्या असताना त्या समस्या निकाली काढण्यासाठी एकदाही पुढाकार न घेतलेल्या तसेच मतदार संघातील शेतकऱ्यांच्या समस्या निकाली काढण्यासाठी ब्रश शब्दही न काढलेल्या व कोणत्या समस्या आहेत. याबाबत कोणतेही माहिती नसलेल्या उमेदवारांना आता विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आमदार होण्याचे डोहाळे लागले आहेत. केवळ पैशाच्या बळावर हे उमेदवार मेहकर लोणार मतदार संघात आपले नशीब अजमावित आहेत. मात्र पैसा फेको तमाशा देखो या म्हणीप्रमाणे ते राजकारणाचे वाटोळे करीत असल्याने मतदार या उपर्या उमेदवारांना स्वीकारतील का असा प्रश्न मतदारसंघात चर्चेला जात आहे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मेहकर विधानसभेत आता हळूहळू रंगत येत आहे. आता उपरे उमेदवार सुद्धा मेहकर मतदार संघावर दावा करत असल्याचे फलक लावून रोडवर चमकत आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात उभी फूट पडल्यानंतर आता शिवसेनेचे दोन गट झालेले आहेत. यातच शिंदे शिवसेना आणि ठाकरे शिवसेना असे दोन गट पडल्यानंतर आता उमेदवार सुद्धा दोन्ही गटाचे असणार असून दोनही शिवसैनिक समोरासमोर येणार आहेत. त्यामुळे ही लढत चांगलीच रंगत होणार आहे. महायुतीचे उमेदवार डॉ. संजय रायमुलकर ही मागील पंधरा वर्षापासून सलग मतदारसंघात असताना त्यांच्या समोर मात्र आता उपरे उमेदवार येऊन मतदारसंघात भेटीगाठी व रोडवर फलक लावून चांगले चमकत आहेत. तर एका बाजुला जनता जनार्दन यांचा कौल कुणीकडे असणार आहे हे सुद्धा तितकच महत्त्वाचे ठरणार आहे. मात्र उपर्या उमेदवार यांना जनता स्वीकारेल का हा एक महत्त्वाचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. एका उपर्या उमेदवारांनी जवळपास मेहकर विधानसभामध्ये शेकडो फलक लावून रोडवर चमकण्याचे काम सुरू केल्याच दिसून येत आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

**कधी न दिसणारे उपरे उमेदवार दिसतायेत निवडणुकीच्या तोंडावर मेहकर शहरासह संपूर्ण मतदारसंघात रस्त्यारस्त्यावर शेकडो फलक लावून चमकताना हे उपरे दिसून येत आहेत.परंतु, मतदार राजा या उपर्यांना स्वीकारेल का असा प्रश्न उपस्थित होत आहे...**

## डॉक्टर ऋतुजा चव्हाण यांना मिळत आहेत चांगली पसंती

मेहकर मतदार संघात गेल्या पंधरा वर्षापासून एकच आमदार सतत निवडून येत असल्याने पाहिजे तशी जनतेची कामे होत नाहीत अनेक समस्या अजून मेहकर मतदार संघात कायमच आहेत पंधरा वर्षे एकच आमदार असून सुद्धा समस्या कायम कशा राहतात असा प्रश्न उपस्थित होत आहे सुशिक्षित बेकारी रोजगार महागाई शेतकऱ्यांचे प्रश्न मूलभूत सुविधा असे अनेक प्रश्न सध्या मेहकर मतदार संघात आहेत.

याच पार्श्वभूमीवर सध्या विधानसभेच्या निवडणुका सुरू होत आहेत विधानसभेच्या निवडणुकीत उभे राहण्यासाठी अनेक उपरे किंवा बाहेरचे इच्छुक उमेदवार जनतेशी संपर्क करत आहेत मात्र मेहकर तालुक्यातील डोणगाव येथील रहिवासी व ज्या मेहकर मतदार संघात सर्वांना सुपरीचीत सुशिक्षित व महिला उमेदवार असलेल्या डॉक्टर ऋतुजा ताई यांना जनतेमधून चांगली पसंती मिळत असून जनता जनार्दन नक्कीच डॉक्टर ऋतुजा चव्हाण यांना आशीर्वाद दिल्याशिवाय राहणार नाही असे चित्र दिसत आहे

## केजरीवाल २ दिवसात मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार; दिल्लीत राजकीय भूकंप

दिल्ली : दिल्लीचे मु'यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दारू धोरण घोटाळा प्रकरणात जामीन मिळाल्यानंतर ते पहिल्यांदाच जाहीर सभेत बोलत आहेत. यावेळी त्यांनी आपण दोन दिवसांनी मु'यमंत्रिपदाचा राजीमामा देणार असल्याचं सांगितलं. आम आदमी पक्षाच्या मेळाव्यात बोलताना केजरीवाल यांनी राजीनाम्याची घोषणा केली. फेब्रुवारीत निवडणूक आहे. पण महाराष्ट्रासोबत निवडणूक घ्यावी अशी मागणी केजरीवाल यांनी केली. जोपर्यंत निवडणूक होणार नाही तोपर्यंत आपकडून इतर नेत्याकडे मु'यमंत्रीपद सोपवलं जाईल असंही केजरीवाल यांनी यावेळी



स्पष्ट केलं. केजरीवाल म्हणाले की, आम्ही सर्वात मोठ्या शत्रूशी लढाई लढली आहे. आमचे नेते सत्येंद्र जैन आणि अमानतु'ा खान अजूनही तुरुंगात आहेत. आशा आहे की ते लवकरच बाहेर येतील. आपल्या स्वातंर्त्यसैनिकांना त्यांच्या सहकाऱ्यांची भेट घेण्याची परवानगी दिली जात होती, पण माझ्या पक्षाच्या सहकारी संदीप पाठक यांना भेटण्याची मला परवानगी दिली नाही. भगतसिंग यांना बटुकेश्वर नाथ यांच्यासोबत इंग'जांनी ठेवलं होतं कारण दोघेही एकाच गुन्ह्यातले आरोपी होते. पण मला आणि मनिष सिसोदियांना वेगवेगळ्या तुरुंगात ठेवलं.मला भेटण्यासाठी संदीप पाठक आले तर आम्ही राजकीय चर्चा केली. त्यावर त्यांनी बंदी घातली असंही केजरीवाल म्हणाले.

राजीमाम्याबद्दल बोलताना केजरीवाल म्हणाले की, मी यासाठी आतापर्यंत राजीनामा दिला नाही कारण मला लोकशाही वाचवायची होती. भाजप आज पक्ष फोडत आहे. निवडून आलेल्या सरकारच्या नेत्यांवर खोट्या केसेस दाखल करत आहे. त्यांना तुरुंगात टाकतायत. पण राजीनामा न दिल्यानं भाजपचा प्लॅन फेल झाला असं म्हणत केजरीवाल यांनी इतर नेत्यांना आवाहन केलं की खोट्या केसेस दाखल केल्यावर राजीनामा देऊ नका.

## उदयनराजे-शिवेंद्रसिंहराजे यांची भेट; निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चर्चा

दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी** : लोकसभा निवडणुकीनंतर खासदार उदयनराजे आणि शिवेंद्रसिंहराजे भोसले रात्री एकत्र आले. लोकसभा निवडणुकीत आलेले अनुभव आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोघांमध्ये बैठक झाली. जिल्ह्यात कोणत्या विधानसभा मतदारसंघात काय भूमिका घ्यायची यावर रणनीती आखण्याबाबत चर्चा झाल्याची माहिती त्या दोघांच्याही सूत्रांनी दिली. गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीत शांततेची भूमिका घेण्याबाबत व कार्यकर्त्यांना तशा सूचना देण्याबाबत दोघांमध्ये चर्चा झाली. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने स्थानिक आमदारांनी मतदारसंघात संपर्क वाढवला आहे. गणेशोत्सवात मंडळांना भेटी देणे, आरतीला उपस्थित राहणे, देणगी देणे आमदारांकडून व इच्छुकांकडून सुरू आहे. आमदार महेश शिंदे यांनी खासदार उदयनराजे यांची भेट घेतली. दोघांमध्ये काही चर्चाही झाली. यानंतर उदयनराजे आणि शिवेंद्रसिंहराजे एकत्र आले. त्यांनी विधानसभा निवडणुकीत कोणत्या मतदारसंघात काय भूमिका घ्यायची याबाबत चर्चा केली. जिल्ह्यात, सातारा व जावली तालुक्यात लोकसभा निवडणुकीत आलेले अनुभव, जिल्ह्याचे सध्याचे राजकारण यावर चर्चा केली. लोकसभा निवडणुकीत शरद पवारांनी त्यांच्या पक्षाच्या उमेदवारासाठी प्रचाराची मोहीम राबवली. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शरद पवार साताऱ्यातील काही विधानसभा मतदारसंघांचा दौरा करणार आहेत. त्याचा जिल्ह्याच्या राजकारणावर काय परिणाम होईल. भाजपला व महायुतीच्या उमेदवारांना काय त्रास होऊ शकतो यावरही चर्चा झाली. मागील अनेक वर्षांच्या वादानंतर आमदार शिवेंद्रसिंहराजे खासदार उदयनराजेंच्या जलमंदिर पॅलेस या निवासस्थानी आले होते. यावेळी भाजपाचे लोकसभा समन्वयक सुनील काटकर उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीत कोणत्या मतदारसंघातून मताधिक्य मिळाले. सातारा जावलीतून कसे मताधिक्य मिळाले, इतर ठिकाणाहून का नाही मिळाले. कोणी कोणती भूमिका घेतली. यावेळी आपण काय भूमिका घ्यायची, याची चर्चा झाली. विधानसभा अधिवेशनानंतर झालेल्या धावपळीमुळे शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची तब्येत ठीक नव्हती. त्याची चौकशी उदयनराजेंनी केली. दोघांच्या भेटीची माध्यम प्रतिनिधींना कल्पना नव्हती. भेटीनंतर दोघांनी एका गाडीतून प्रवास केला.

# गेलेली सत्ता पुन्हा खेचून आणणार, उद्धव ठाकरे यांचा महायुतीला इशारा

## उद्धव ठाकरे यांनी महायुतीवर हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आज शिर्डी आणि छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूवीर उद्धव ठाकरे यांचा हा दौरा महत्वाचा मानला जात आहे. या दौऱ्यावेळी त्यांनी जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी सुरु असलेल्या महाअधिवेशनाला हजेरी लावली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी महायुतीवर हल्लाबोल केला. तसेच गेलेली सत्ता पुन्हा येईल. गेलेली सत्ता पुन्हा खेचून आणणार आहे, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी महायुतीच्या नेत्यांना दिला आहे.

मी देखील या ठिकाणी आलो आहे. मला सत्तेची पर्वा नाही. मला तुमच्या आयुष्याची चिंता आहे. मला तुमच्या कुटुंबाची पर्वा आहे. सत्ता येत असते आणि सत्ता जात असते. गेलेली सत्ता पुन्हा येणार आहे. गेलेली सत्ता पुन्हा खेचून आणणार आणि सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे. मात्र, एक लक्षात घ्या, एकजूट महत्त्वाची आहे. याआधी एकदा जुनी पेन्शन योजनेसाठी तुम्ही सर्वजण नागपूरला आला होतात. मात्र, तुमच्यापैकी एक घटक तिकडे गेला आणि तुमच्या आंदोलनावर पाणी ओतलं. जे फोडाफोडीचं राजकारण शिवसेनेबरोबर करण्यात आलं. हे जुनी पेन्शन योजनेसाठी आंदोलन करणाऱ्यांबरोबर देखील करतील. हे सरकार गेल्यात जमा आहे. खरं तर महायुतीच्या नेत्यांना सत्तेशिवाय उपाशी ठेवलं पाहिजे, असा निर्धार करायला हवा, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी महायुतीवर केला. विधानसभेची निवडणूक जवळ येईपर्यंत ज्यांना आपली बहीण माहिती नव्हती. त्यांनी लाडकी बहीण योजना आणली. आता दोन महिन्यांनी निवडणुका आहेत. मी तुम्हाला वचन देतो की, दोन महिन्यांनी आपलं सरकार आलं तर मी तुमची जुनी पेन्शन योजनेची मागणी मान्य करतो. आता मी ही घोषणा केल्यानंतर महायुतीला घाम फ ुटेल आणि ते ही तुमची मागणी कदाचित मान्य करतील. हा दगाफटका तुम्हाला नाही तर महाराष्ट्राला होणार आहे. पण तुम्ही एक लक्षात घ्या ज्यांनी माझ्याशी गद्दारी केली त्यांना मी कुटुंबातील मानलं होतं. ते विश्वासघात करू शकतात मग हे तुमच्यावर वार करू शकणार नाहीत का? त्यामुळे मला हे सरकार नको आहे. मला मुख्यमंत्री होण्याचं स्वप्न तेव्हाही नव्हतं आणि आताही नाही, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी महायुतीवर केला.



मला सत्तेमधून कोणीही निवृत्त करु शकत नाही. मी सत्तेत असलो किंवा नसलो तरी जोपर्यंत जनता माझ्याबरोबर आहे. तोपर्यंत सत्ता ही आपल्याकडेच राहील. कारण जनतेची सत्ता आहे. सरकार वेगळं असलं तरी जनतेची सत्ता ही महत्वाची असते. जनता हीच माझी ताकद आणि जनता हीच माझी सत्ता आहे, असंही उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

## संशोधनाला प्रोत्साहन, स्वागतार्ह निर्णय...


जगातील इतर प्रमुख देशांच्या तुलनेत संशोधन आणि विकासामध्ये भारताची गुंतवणूक खूपच कमी आहे. भारत सध्या यासाठी दरवर्षी सुमारे २० अब्ज डॉलर खर्च करत असून हे प्रमाण जीडीपीच्या केवळ अर्धा टक्का आहे. सरकारला लक्षात आले की यात भरीव गुंतवणूक करावी लागेल. त्यामुळे मोदी सरकारने २०२४ च्या अंतरिम अर्थसंकल्पात संशोधन आणि विकासासाठी १ लाख कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय निधीची घोषणा केली. अलीकडेच सरकारने कृषी आणि संलग्न क्षेत्रांना प्रोत्साहन देण्यासाठी १४ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याची घोषणा केली. देशात संशोधनाला चालना देण्यासाठी अलीकडेच अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशनची (एएनआरएफ) स्थापना करण्यात आली आहे. या फाउंडेशनच्या प्रशासकीय समितीच्या पहिल्या बैठकीत पंतप्रधान मोदींनी देशातील वैज्ञानिक समुदायाला विश्र्वास दिला आहे की संशोधन आणि विकासासाठी संसाधनांची कमतरता भासणार नाही. देशातील संशोधन परिसंस्थेतील अडथळे ओळखून ते दूर करण्याचे आश्र्वासनही त्यांनी दिले आहे. चांद्रयान, मंगळयान, उपग्रह प्रक्षेपण, क्षेपणास्त्रे इत्यादी क्षेत्रात कमी खर्चात भारताने आपली क्षमता सिद्ध केली आहे. आता भारताने रशियाच्या सहकार्याने अंतराळात स्वतःचे स्टेशन बनवण्याचे ठरवले आहे. भारतात संशोधनाच्या क्षेत्रात अपार संधी आहेत. विकसित भारताचे उद्दिष्ट गाठायचे असेल तर उच्च तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वर्चस्व आवश्यक आहे. भारताला विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या लॅंडस्केप आणि संशोधन आणि विकास कार्यक्रमांची पुनर्रचना करण्याचा विचार करावा लागेल. भारताला फार्मा, ग्रीन एनर्जी, सेमीकंडक्टर, नॅनोटेक, बायोटेक, डिजीटेक, स्पेस सायन्स, सायबर शस्त्रे, पर्यावरणपूरक विकास मॉडेल इत्यादी क्षेत्रात प्रचंड संशोधनाची गरज आहे. लोकजीवन सुरक्षित आणि सुलभ बनवणाऱ्या संसाधनांच्या क्षेत्रात अधिक संशोधन आणि गुंतवणुकीची गरज आहे. इलेक्ट्रिक वाहन गतिशीलता, प्रगत साहित्य, सौर सेल, स्मार्ट पायाभूत सुविधा, आरोग्य आणि वैद्यकीय तंत्रज्ञान, शाश्र्वत शेती आणि फोटोनिक्स यासारख्या निवडक प्राधान्य क्षेत्रांमध्ये एएनआरएफ हे मिशन मोडमध्ये उपायकेंद्रित संशोधनावर कार्यक्रम सुरू करेल. ’जय विज्ञाना’चा नारा तेव्हाच यशस्वी होईल जेव्हा भारत विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात ग्राहक म्हणून नव्हे तर खेळाडू म्हणून उदयास येईल. यासाठी सरकारबरोबरच खासगी क्षेत्राचाही संशोधन आणि विकासात सहभाग असणे आवश्यक आहे. आज अनेक छोट्या-छोट्या देशांनी रिसर्च अँड डेव्हलपमेंटवर मोठ्या प्रमाणावर खर्च करून आपला विकास साधला आहे. जपानसारखा देश याचे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल. जपानने शिक्षणाच्या क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली आणि त्यातून अत्यंत कुशल मनुष्यबळ विकसित केले. यासाठी जपानने जीडीपीच्या ४ ते ५ टक्के पैसा खर्च केला. इस्रायलसारख्या छोट्या देशाचे उदाहरण घेतल्यास या देशाला सातत्याने शेजारच्या देशांशी संघर्ष करावा लागत आहे. असे असतानाही इस्रायलने जगाला अचंबित करणारी क्रांती घडवून आणली. याचे मूळ त्यांनी संशोधन आणि विकासावर केलेल्या खर्चामध्ये आहे. जपानप्रमाणेच इस्रायलही जीडीपीच्या ४ ते ५ टक्के निधी यासाठी खर्च करतो. या माध्यमातून इस्रायलने एक उत्तम स्टार्टअप इकोसिस्टीम तयार केली आहे. भारताने या राष्ट्रांचा आदर्श घेण्याची गरज आहे. आपल्याकडे विद्यापीठे आणि मोठ्या संशोधन संस्था यांमध्येच संशोधनाचे काम होते. त्याबरोबरच महाविद्यालय स्तरावरही संशोधन व्हावे यासाठीही प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्यामुळे आधुनिक व गतिमान नवी शिक्षणव्यवस्था निर्माण होऊ शकेल. संशोधनासाठी विश्र्लेषणात्मक, चिकित्सक वृत्ती आवश्यक असते. त्या दृष्टीने शालेय स्तरापासूनच याबाबत काही काम होणे आवश्यक आहे. नव्या शैक्षणिक धोरणात यासंदर्भात गांभीर्याने विचार केला असला तरी त्याची तितक्याच प्रभावीपणे अंमलबजावणी व्हायला हवी. सेवाक्षेत्राचे जीडीपीतील योगदान कितीही वाढत असले तरी भारत हा कृषीप्रधान देश आहे. या पार्श्र्वभूमीवर संशोधन आणि विकासामध्ये कृषी संशोधनाला महत्तम प्राधान्य असायला हवे. विशेषतः आजच्या हवामान बदलांच्या काळात याची गरज अधिक प्रकर्षाने समोर येत आहे. आयसीएआरचा अनुभवाधारित अभ्यास असे दर्शवितो की, कृषी क्षेत्रातील संशोधन आणि विस्तारासाठी केलेल्या गुंतवणुकीचा मोबदला लक्षणीय आहे. या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, कृषी संशोधनावर खर्च केलेला प्रत्येक रुपया आपल्याला १३.८५ रुपये परत करतो, विस्तारावर ७.४० रुपये आणि पशुधन क्षेत्रावर २०.८१ रुपये परतावा देतो. हा परतावा अर्थव्यवस्थेच्या इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा खूप अधिक आहे. २००८ मध्ये ’रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया’ च्या अभ्यासात असे नमूद केले आहे की, एक रुपया कृषी संशोधन आणि विकासावर खर्च केल्यास आपल्याला त्याचा १३.४५ रुपये इतका परतावा मिळतो. कृषी संशोधन, शिक्षण आणि ग्रामीण पायाभूत सुविधांमध्ये केलेली गुंतवणूक ही कृषी विकास आणि गरिबी निर्मूलनासाठी सर्वांत प्रभावी ठरत असल्याचेही ‘आरबीआय’ने म्हटले आहे. त्यामुळे अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशनची स्थापना हा संशोधन व विकासाच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा असला तरी अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे याचे भान सदोदित ठेवायला हवे.

# हिवरा आश्रम येथील शासकीय रुग्णालय सर्व सुविधांसह तात्काळ सुरु करा

## अन्यथा बैठा सत्याग्रह: माजी मंत्री सुबोध सावजी यांचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : हिवरा आश्रम येथील शासकीय रुग्णालयाकरिता गत सहा वर्षापूर्वी कोट्यवधी रुपये खर्च इमारत उभी करण्यात आली आहे. परंतु, सदर इमारतीमध्ये सुविधांचा अभाव असल्याने या इमारतीचा रुग्णांना कोणताही फायदा होत नाही. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असून हिवरा आश्रम येथील शासकीय रुग्णालयाची इमारत सर्व सुविधांसह सुरू करावी, तसेच आवश्यक असणारा अधिकारी, कर्मचारी यांचा स्टाफ तात्काळ नियुक्त करावा,अन्यथा १० ऑक्टोबरपासून हिवरा आश्रम येथील ग्रामीण रुग्णालयासमोर बैढा सत्याग्रह करण्यात येईल, असा इशारा माजी आ. तथा माजी मंत्री सुबोध सावजी यांनी





मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह आरोग्य मंत्री, पालकमंत्री, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री,आ. संजय रायमुलकर यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

मेहकर तालुक्यातील हिवरा आश्रम येथील शासकीय रुग्णालय हे सहा वर्षापासून बांधून पूर्ण झाले आहे. सदर रुग्णालयाची इमारती जिल्ह्यातील उत्कृष्ट अशी इमारत आहे. रुग्णालयात एकूण ७५ खोल्या आहेत. यामध्ये डॉक्टरांचे कक्ष महिलांकरिता ऐसपैस निवासी वार्ड त्याचप्रमाणे पुरुषांकरिता सुद्धा निवासी वार्ड, लहान मुलांच्या उपचाराकरिता स्वतंत्र कक्ष आहेत. शवविच्छेदनाची सुविधा येथे आहे. अतिशय सुंदर बांधलेली इमारत आवश्यक सर्व भौतिक सुविधा उपलब्ध असताना गेल्या सहा वर्षांपासून हे शासकीय रुग्णालय आवश्यक वैद्यकीय अधिकारी व कर्मचार्याअभावी सेवेत नाही. शनिवार दि.१४ सप्टेंबर रोजी हिवरा आश्रम येथील शासकीय रुग्णालयास भेट दिली असता त्यावेळेस रुग्णालयात एकही वैद्यकीय अधिकारी उपस्थित नव्हते. त्या ठिकाणी फक्त कामगार उपस्थित होते. जवळपास २१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ११ महिन्याच्या अटीवर ३ एमबीबीएसची डॉक्टर व ८ कर्मचारी असे एकूण ११ कर्मचारी सेवेत आहेत. या रुग्णालयामध्ये रोजची ओपीडी २० ते ७० आहे. रुग्णालयात ऍडमिट होण्याकरिता मूलभूत बेड आहेत. परंतु रुग्णालयात व्यवस्था पूर्ण नसल्यामुळे येथे एकही रुग्ण ऍडमिट केल्या जात नाही. प्रशस्त इमारतीवर कोरडो रुपये खर्च केले आहेत. परंतु, शासकीय रुग्णालयाची इमारत ही रुग्णांसाठी गैरसोयीची ठरत आहे. या रुग्णालयात ७५ खोल्यांमध्ये सुविधा आहेत. परंतु, उपचार उपचारीक सुविधा नाहीत.

जिल्ह्यातील व तालुक्यातील लोकप्रतिनिधी तसेच वैद्यकीय अधिकारी यांचे या रुग्णालयाकडे जाणून-बजून दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. संजय रायमुलकर यांचे राहते गाव या ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरातच १० किलोमीटर अंतरावर आहे. विधानसभा मतदारसंघाचे भूतपूर्व तीन वेळा राहिलेले आमदार तसेच मेहकर निवासी लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी प्रतापराव जाधव हे गेल्या पंधरा वर्षापासून या विभागाचे प्रतिनिधित्व करीत असताना त्यांनी याकडे हेतू पुरस्कार दुर्लक्ष केले आहे.

तरी लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देऊ देऊन हे रुग्णालय सर्व सुविधा, औषधीसाठा, कर्मचाऱ्यांसह एक महिन्याच्या आत सुरू करावे, तसेच रुग्णालयाचा परिसर स्वच्छ करावा, अन्यथा बैठा सत्याग्रह करण्यात येईल, असा इशारा माजी मंत्री सुबोध सावजी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह संबंधीत लोकप्रतिनिधी तसेच संबंधीत अधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

# गणेशोत्सवात झेंडू दराने गाठली शंभरी; पावसामुळे झेंडूच्या उत्पादनात घट

दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी** : गणेशोत्सवापूर्वी चाळिस रुपये किलो असा दर असलेल्या झेंडूने गणेशोत्सवात मात्र घाऊक बाजारात शंभरी गाठली आहे. उत्सवात दर फुलल्यामुळे झेंडू उत्पादकांना गणराय पावला आहे. वाढीव दरामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे. ‘गोल्डन यलो’ आणि ‘गोल्डन ऑरेंज’ जातीची झेंडूची फुले ही किरकोळ बाजारात गणेशोत्सवात ३०० रुपये किलो दराने विकली गेली.गणेशोत्सवापूर्वी बाजारात झेंडूच्या फुलाचे दर पडल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील चिंता दिसून येत होती. यंदा सतत पाऊस असल्याने झेंडूची लागवड कमी झाली आहे. शिवाय ज्यांनी लागवड केली त्यांचा उगवलेला झेंडूदेखील सततच्या पावसामुळे खराब झाला आहे. दुसरीकडे ढगाळ वातावरणामुळे यंदा झेंडूवर रोगाचा प्रादुर्भावदेखील अधिक प्रमाणात आहे.

दरम्यान ज्या भागात पाऊस कमी झाला त्या ठिकाणी झेंडुचे उत्पादन चांदले आले. या शेतकऱ्यांचा माल सध्या बाजारात येत आहे. सध्या बाजारात लाल पिवळ्या रंगांची झेंडूची फुले आहेत. यामध्ये लाल -केशरी रंगात ऑरेंज, कलकत्ता, जंबो आदी जाती आहेत; तसेच पिवळ्या रंगात ‘स्मार्ट यलो’, कांचन, श्रावणी जातीची फ ुले विक्रीसाठी आली आहेत. पिवळ्या झेंडूचा दर शंभर रुपये किलोपर्यंत पोहचला आहे. म ागणी अधिक असल्याने केशरी रंगाच्या झेंडूचा दर किलोला शंभरी पार करत सव्वाशे झाला आहे. शेवंतीच्या फुलाचीसुद्धा आवक आहे. शेवंतीचा दर सध्या दीडशे ते दोनशे रुपयापर्यंत आहे. घाऊक बाजारात पुणे व मुंबई येथे सातारा, सांगली येथून जास्त आवक आहे. यंदा महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने फूलबागांचे नुकसान झाले आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत कर्नाटकमधील बंगळुरूला जेमतेम पाऊस असल्याने बागा वाचल्या आहेत. पुण्या-मुंबईच्या फुलांच्या घाऊक बाजारात बंगळुरूची फ ुले सध्या मोठ्या प्रमाणात येत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. स्थानिक फुलांच्या दराला परप्रांतांतील फुलांची स्पर्धा करावी लागत आहे. जिल्ह्यात सातारा, वाई, खटाव, माण, फलटण, कोरेगाव, खंडाळा, जावळी, कराड तालुक्यांत शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात झेंडूची लागवड करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु पाणी साचणाऱ्या शेतामध्ये यंदा सततच्या पावसाने उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. पावसाने उघडीप दिल्याने दसरा, दिवाळी डोळ्यासमोर ठेवून शेतकरी झेंडूची चांगलीच काळजी घेत आहेत. दर मि ळण्याच्या आशेने काही नव्याने लागवड करण्याच्या तयारीत आहेत.

**कृत्रिम फुलांची स्पर्धा**

सणासुदीच्या दिवसांत देवाला हार आणि सजावटीसाठी फुलांचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येतो. उत्सव काळात वाढणारे दर यामुळे अलीकडे काही लोक प्लॅस्टिकच्या कृत्रिम फुलांचे हार, माळा याचा अधिक वापर करतात. जास्त दिवस टिकत असल्याने लोकांचा त्यांकडे कल वाढला आहे. सध्या बाजारात रंगीबेरंगी कृत्रिम फुलांची रेलचेल आहे. त्यांनी खऱ्या फुलांपुढे स्पर्धा निर्माण केली आहे.

**केशरी झेंडूला अधिक दर**

पाऊस जास्त झाल्यामुळे दादर फूल मार्केटमध्ये मालाची आवक कमी आहे. रोगाचा प्रादुर्भाव असल्याने चांगल्या दर्जाची फुले येत नाहीत. चांगल्या दर्जाच्या झेंडूला दर देखील चांगला आहे. महाराष्ट्रापेक्षा बंगळुरूहून अधिक माल बाजारात येत आहे. सध्या झेंडूच्या पिवळ्या वाणापेक्षा केशरी वाणाला अधिक दर आहे. दसरा-दिवाळीलादेखील दर टिकून राहतील अशी शक्यता आहे.- रमेश शिंदे, फ ूल व्यापारी, मीनाताई ठाकरे फ ूल मार्केट, दादर

## युवराज सिंगच्या बायोपिकमध्ये करणार फातिमा सना शेख ही महत्त्वाची भूमिका!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महेंद्रसिंग धोनी आणि सचिन तेंडुलकर यांच्यानंतर आता २०११ च्या विश्र्वचषक विजेत्या युवराज सिंगवर बायोपिक बनणार आहे. नुसता खेळच नाही, तर विश्र्वचषकादरम्यान तो शरीराने लढत असलेल्या लढाईची कहाणी मोठ्या पडद्यावर दाखवण्यात येणार आहे. भारताच्या विजयाचा हिरो युवराज सिंग हा खऱ्या आयुष्यातही हिरो आहे. युवराज सिंगच्या चित्रपटाचे दिग्दर्शन रवी भागचंदका करत आहेत. त्याचवेळी टी सीरीजचे मालक भूषण कुमार याची निर्मिती करत आहेत. या चित्रपटात युवराज सिंगची भूमिका कोण साकारणार हे अद्याप निश्र्चित झालेले नाही. मात्र विकी कौशल आणि रणवीर सिंग या दोन नावांची चर्चा सुरू आहे. दरम्यान, बातमी आली होती की, फातिमा सना शेख या चित्रपटात युवराज सिंगची प्रेयसी बनणार आहे.

फातिमा सना शेख अनेक चित्रपटांमध्ये दिसली आहे. यात ‘दंगल’, ‘लुडो’ आणि ‘सॅम बहादूर’चा समावेश आहे. तिच्या शेवटच्या चित्रपटात तिने माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली होती. मात्र, मेकर्स किंवा फातिमा सना शेख यांनी अद्याप कोणतीही माहिती दिलेली नाही.

नुकताच सिनेजोशवर एक रिपोर्ट प्रसिद्ध झाला होता. यावरून युवराज सिंगच्या बायोपिकसाठी कास्टिंग केले जात असल्याचे समोर आले. या चित्रपटात त्याची भूमिका कोण साकारणार यासाठी कोणताही अभिनेता फायनल झालेला नाही. पण ज्या दोन नावांची चर्चा आहे ती म्हणजे विकी कौशल आणि रणवीर सिंग. युवराज सिंगची भूमिका साकारण्याआधी त्याच्या लव्ह इंटरेस्टसाठी अभिनेत्रीला फायनल करण्यात आले आहे. ही दुसरी कोणी नसून फातिमा सना शेख आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून युवराज सिंगचे संपूर्ण आयुष्य मोठ्या पडद्यावर दाखवण्यात येणार आहे. त्याच्या चित्रपटाचीही चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत.

# जलजीवन योजनेच्या कामाची चौकशी थंडबस्त्यात

## कोट्यावधींचा खर्च पाण्यात : तालुक्यातील ९२ जलजीवन मिशन योजना अर्धवट

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर व लोणार तालुक्यातील जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनेच्या कामात झालेल्या गैरप्रकारची चौकशी करावी, अशी मागणी आमदार डॉ. संजय रायमुलकर यांनी दि.२० ऑगस्ट रोजी पाणीपुरवठा मंत्री यांच्यासोबत बैठक घेऊन केली होती. यावेळी पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी तात्काळ चौकशी आदेश दिले होते. परंतु, अद्यापही चौकशी झाली नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे या गैरप्रकाराची चौकशी करणार कोण व कोणाची चौकशी होणार हा गंभीर प्रश्र्न मेहकर मतदार संघात चर्चेला जात आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून ग्रामीण भागातील नागरिकांना प्रति व्यक्ती ५५ लिटर गुणवत्तापुर्ण व शुध्द पाणी देण्यासाठी सरकारने जल जीवन मिशन योजना सुरु केली. बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील ग्रामीण भागात सन २०२१ २०२२ पासून जिल्ह्यात




योजनांच्या कामाला प्रारंभ झाला.परंतु अद्यापही हे कामे पूर्ण झाली नाहीत तर, या कामात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला आहे.पावसाळ्यात उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी प्रशासकीय स्तरावरुन योग्य ती पाऊले उचलण्याची गरज असताना याकडेही दुर्लक्ष केले गेले आहे. ग्रामीण भागातील जनतेला नळ जोडणीच्या माध्यमातून शुध्द व स्वच्छ पाणी देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जलजीवन मिशन योजना आणली. सन २०२४ पर्यत ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रतिदिन गुणवत्तापुर्ण पाणीपुरवठा करण्याचे जल जीवन मिशनचे मुख्य उदिष्ट आहे.

या योजनेंतर्गत मेहकर तालुक्यातील ९२ गावांत जलजीवन योजनेवर कामे टाकण्यात आले. सन २०२१,२०२२ मध्ये निविदा प्रक्रीयाही पार पडली. सन २०२१,२०२२ पासून बहुतांश कामाला सुरवात झाली. काही कामांची निविदा नंतर होऊन कामाची कामाची संख्या वाढत गेली. मात्र अल्पावधीतच अनेक गावातून कामांबाबत तक्रारी देखील वाढल्या. कंत्राटदारांकडून कामात दिरंगाई होत असल्याचा आरोपही




झाला. आधी २०२४ मध्ये पुर्ण होण्याचा कालावधी असतांना तालुक्यातील एकही योजना आजपर्यंत पूर्ण न झाल्याचे चित्र आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून सातत्याने कामाची गती वाढविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली जात असली तरीही जलजीवन मिशनची गती मात्र मंदावलेलीच आहे. बहुतांश ठिकाणी होत असलेल्या कामांच्या तक्रारीही करण्यात आल्या असल्यामुळे कामाचा दर्जा तपासण्याची मागणी झाली. या तक्रारीची दखल घेत आमदार डॉ. संजय रायमुलकर यांनी दि.२० ऑगस्ट रोजी पाणीपुरवठा मंत्री यांच्यासोबत बैठक घेऊन मेहकर व लोणार तालुक्यातील जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनेचे कामाची चौकशी करावी, अशी मागणी केली.तर पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी तात्काळ चौकशी आदेश दिले. मात्र अद्यापही चौकशी झाली नसल्याने ही चौकशी करणार कोण व कोणाची चौकशी होणार असा प्रश्र्न मेहकर मतदार संघातील चर्चेला जात आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### लाडक्या बहिणींचा देवा भाऊ या उपक्रमात साड्या अपुऱ्या पडल्यामुळे बहिणींचा झाला हिरमोड



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपल्याने सर्वच पक्षात श्रेयवादाची चढाओढ लागलीय. लाडकी बहीण योजनेचे श्रेयवाद घेण्यासाठी महायुतीतील तिन्ही पक्ष लढत आहेत.आज नांदेडच्या तामसा येथे लाडकी बहीण योजना लाडक्या बहिणींचा देवा भाऊ या उपक्रमा अंतर्गत साडी वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दोन हजार साड्या वाटप करण्याचे आयोजकांनी सांगितले होते. परंतु महिलांची संख्या जास्त झाली. साड्या कमी पडल्या आणि याठिकाणी साड्या घेण्यासाठी महिलांची एकच झुंबड उडाली. साड्या वाटपापूर्वीच हा कार्यक्रम आयोजकांना बंद करावा लागला. अनेक महिला साड्या न घेताच परत निघून गेल्या. सकाळपासून साड्या घेण्यासाठी ह्या महिला तामसा येथे हजर झाल्या होत्या.परंतु साड्या न मिळाल्याने त्यांचा हिरमोड झाला.

### धनगर आरक्षण पेटले, दिलीप मानेंनी पंढरपुरात घेतली उपोषणाकर्त्यांची भेट



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या प्रवर्गामधून आरक्षण लागू करावे, या प्रमुख मागणीसाठी सकल धनगर समाजाच्या वतीने पंढरपूर येथे राज्यस्तरीय उपोषण आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या विविध सामाजिक राजकीय नेत्यांकडून पाठिंबा दर्शवला जात आहे. त्याचप्रमाणे सोलापूर दक्षिण मतदारसंघाचे माजी आमदार दिलीप माने यांनी देखील रविवारी उपोषणस्थळी आंदोलकांची भेट घेऊन आपला पाठिंबा दर्शवला आहे. आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू झालेले धनगर समाजाच्या उपोषण आंदोलनाला सात दिवस होत आले. मात्र सरकारकडून अद्यापही यावर तोडगा काढण्यात आलेला नाही. त्यामुळे हे आंदोलन अधिक तीव्र होताना दिसून येत आहे. तसेच समाजातील विविध स्तरातून धनगर समाजाच्या आंदोलनास पाठिंबा मिळताना दिसून येत आहे. याच पार्श्र्वभूमीवर माजी आमदार दिलीप माने यांनी देखील पंढरपुरातील धनगर समाजाच्या उपोषण आंदोलन स्थळी उपस्थिती लावली. या प्रसंगी बोलताना दिलीप माने म्हणाले की, धनगर समाजाला मागच्या अनेक वर्षांपासून आश्र्वासनावर आश्र्वासने दिली जात आहेत. पण भाजप सरकारकडून ठोस पाऊल उचलले जात नाहीत. तसेच धनगर समाजाचा सत्ताधाऱ्यांनी राजकीय तसेच सामाजिक फायदा घेतला. पण या समाज बांधवाना न्याय दिला नाही. त्यामुळे सर्वच स्तरावर या समाजाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परिणामी नाईलाजास्तव धनगर समाज बांधवांना उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला असल्याचे मत माने यांनी व्यक्त केले.

### महायुतीतही मुख्यमंत्रीपदासाठी रस्सीखेच?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात आगामी विधानसभेच्या अनुषंगाने राज्यात मोठी तयारी झाली आहे, अशातच आता राज्याच्या मुख्यमंत्रीपदासाठी देखील मोठी रस्सीखेच सुरू झाल्याचं चित्र आहे.विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुतीतील नेत्यांमध्ये खडाजंगी उडत आहे.अशातच बॅनर वार मधून देखील आपलाच मुख्यमंत्री राहणार आशा आशयाचे बॅनर लागत आहेत. अशातच आता कार्यकर्त्यांकडून आपापल्या नेत्यांच्या मुख्यमंत्रीपदासाठीच्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. नांदेडमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भावी मुख्यमंत्री म्हणून बॅनर्स लागले आहेत. नांदेड शहरातील अनेक मुख्य चौकात हे बॅनर लागल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. सध्या या बॅनरची जोरदार चर्चा सुरू आहे. महायुतीत जागा वाटपावरून आणि मुख्यमंत्री पदावरून वाद सुरू असून हा वाद आता चव्हाट्यावर येताना दिसत आहे. बारामतीत उपमुख्यमंत्री अजित पवारांचे भावी मु'यमंत्री म्हणून बॅनर लागले आहेत. सध्या गणपती उत्सव साजरा केला जात आहे. बारामती शहरातील अखिल भारतीय तांदुळवाडी वेस या गणपती मंडळाने अजित पवारांचा भावी मुख्यमंत्री असा उल्लेख केलेला बॅनर सगळ्यांचं लक्ष वेधून घेत आहे. गेल्या अनेक दिवसापासून बारामतीतील कार्यकर्त्यांची इच्छा आहे की अजित पवार पवार मुख्यमंत्री व्हावेत.. या आधी देखील अनेक वेळा अजित पवारांचे भावी मु'यमंत्री आशा आशयाचे फ्लेक्स लागले होते. शंभूराज देसाई यांनी पुण्यातील दगडूशेठ गणपती मंदिराचे दर्शन घेतलं. यावेळी त्यांनी दगडूशेठ गणपतीला साकडं घातलं. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले, दगडूशेठ मंदिरासमोर सांगतो, महायुतीला बहुमतापेक्षा जास्त जागा मिळणार आणि पुन्हा महायुती सत्तेत येणार आहे. आमचे नेते एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावेत असं मला वाटतं.

# सलमान खान एकनाथ शिंदेंकडे बाप्पाच्या दर्शनाला

## खास भेटीचे फोटो मुख्यमंत्र्यांनी केले शेअर

दैनिक आपला विदर्भ





**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या सर्वत्र गणेशोत्सवामुळे जल्लोषाचं वातावरण आहे. प्रत्येक जण एकमेकांच्या घरी गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी जातात. कलाकार मंडळींनीसुद्धा त्यांच्या बाप्पाचे फोटो शेअर करत सर्व चाहत्यांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. अशातच बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी बाप्पाच्या दर्शनासाठी गेला होता. त्याचे काही फोटो एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवर शेअर केले आहेत.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय एकनाथ शिंदे यांनी सलमान खानसोबतचे फोटो शेअर करत कॅप्शन लिहिलं आहे की, 'सुप्रसिद्ध अभिनेते सलमान खान यांनी काल वर्षा निवासस्थानी उपस्थित राहून श्री गणेशाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि श्री गणेशाची मूर्ती देऊन सन्मानित केले. तसेच याप्रसंगी त्यांच्या शुभहस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. यावेळी माझा पुत्र खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, स्नुषा सौ.वृषाली आणि इतर मान्यवर उपस्थित होते.'

एकनाथ शिंदे यांनी शेअर केलेल्या फोटोमध्ये सलमान गणपती बाप्पाच्या मूर्तीसमोर हात जोडून नमस्कार करताना दिसत आहे. दुसऱ्या फोटोमध्ये एकनाथ शिंदे यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, आणि गणपती बाप्पाची मूर्ती देऊन सलमान खानला सन्मानित केलं. त्याचबरोबर सलमान खानची बहीण अर्पिता खान हिला सुद्धा सन्मानित करण्यात आलं.

सलमानच्या बहिणीच्या म्हणजेच अर्पिताच्या घरीसुद्धा गणपती बाप्पाचं आगमन झालं होतं, त्याचे काही फोटो आणि व्हिडिओसुद्धा सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. सलमानने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर गणरायाच्या विसर्जनाचा व्हिडिओ शेअर केला होता. व्हिडिओमध्ये सलमान, कुटुंबियांसोबत नाचताना दिसत आहे. व्हिडिओमध्ये सलमानची बहीण अर्पिता खान शर्मा आणि तिचा अभिनेता-पती आयुष शर्मा देखील त्यांच्या मुलांसोबत उत्साहात नाचताना दिसत होते. त्याचबरोबर मुकेश आणि नीता अंबानी यांच्या घरी गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी सलमान गेला होता.दरम्यान, सलमानच्या वर्क फ्रंटबद्दल सांगायचं झाल्यास सलमान बिग बॉस १८ हा शो होस्ट करताना दिसणार आहे. त्याचबरोबर एआर मुरुगदास यांच्या क्शन ड्रामा 'सिकंदर' या चित्रपटातून झळकणार आहे.

# बीड जिल्ह्यात १८ तलवारी जप्त, गेवराई पोलीसांची कारवाई

दैनिक आपला विदर्भ





**बीड/प्रतिनिधी** :बीड जिल्ह्यामध्ये सार्वजनिक सुव्यवस्था तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीसांकडून शर्तीचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

आगामी गणेशोत्सव व विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर पोलीसांनी अवैध धंद्यांवर कार्यवाही करण्याचे योजिले आहे .यातच दिनांक १४ रोजी गेवराई तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग ५२ वरील पागळसिंगी टोल प्लाझा नजीक त्रिमुर्ती हॉटेलजवळ १८ तलवारींची मोटारसायकल वरुन वाहतूक करताना भगवान पवार याला गेवराई पोलीसांनी सापळा रचून ताब्यात घेतले आहे. यामध्ये अंदाजे ३६००० रुपये किंमतीच्या १८ तलवारी जप्त करण्यात आल्या आहेत. शस्त्र बाळगण्याचा कोणताही परवाना न बाळगता तलवारींची वाहतूक करताना मिळुन आल्याने भगवान पवार याच्या विरुद्ध सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक लंके यांच्या फिर्यादीवरून कलम ४/२५ आर्म अॅक्ट १९५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक डॉ. शिवाजी भुतेकर हे करत आहेत. सदरील कारवाई पोलिस अधीक्षक बीड, उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई पोलीसांनी केली आहे.

### 'गोल्डन बॉय' नीरज चोप्राची अवघ्या एका सेंटीमीटरनं 'डायमंड' संधी हुकली

नवी दिल्ली : भारताचा डबल ऑलिम्पिक पदक विजेता नीरज चोप्रानं पुन्हा एकदा भारतीय चाहत्यांची निराशा केली आहे. नीरज चोप्रा डायमंड लीग २०२४ चं विजेतेपद मिळवू शकला नाही. भारतीय चाहत्यांना त्याच्याकडून विजेतेपदाची अपेक्षा होती पण नीरजला तसं करता आलं नाही. यापूर्वी चोप्रानं ८९.४९ मीटर फेक करत डायमंड लीग मीटिंग सिरीजमध्ये दुसरं स्थान मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला होता. वास्तविक, नीरज चोप्रा दीर्घकाळापासून कंबरेच्या दुखापतीनं त्रस्त आहे. ज्यामुळं पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकण्यात तो अपयशी ठरला होता .


### लातूर शहर व ग्रामीणची जागा शिवसेना लढणार : सचिन दाने

**लातूर/प्रतिनिधी** :लातूर जिल्ह्यात शिवसेनेची मोठी ताकद आहे.या बळावर लातूर शहर व लातूर ग्रामीण या दोन विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढविण्याचा निर्धार पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केला असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने यांनी दिली. लातूर शहर व ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत दाने बोलत होते. ते म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी,विधानसभा निवडणुकांच्या तयारी साठी शिवसेना लातूर जिल्हा,लातूर शहर आणि ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपर्कप्रमुख अँड बळवंत जाधव यांच्या उपस्थितीत आणि शिवसेना लातूर जिल्हाप्रमुख सचिन दाने यांच्या अध्यक्षतेखाली लातूर विश्रामगृह येथे घेण्यात आली.

# बिबी पोलीस स्टेशन अंतर्गत अज्ञात चोरट्यांचे धुमाकुळ भुमराळयात घर फोडी एक लाख रुपयांचा ऐवज लंपास

## कुटुंबाला घरातील खोलीत कोंडून केली चोरी





दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** ग्राम भुमराळा येथील आरोग्य सेवक नारायण गोविंदराव सानप वय ५४ वर्ष यांच्या घरी दि १३ सप्टेंबर च्या रात्री अज्ञात चोरट्यांनी घर फोड्डन अंदाजे ११५०००/रू ऐवज लंपास केल्याची घटना घडल्याने गावकरी भयभीत झाले आहे.

सदर प्रकरणाची माहीती देवानंद सानप यांनी शंभर नंबर वर फोन कळविले असता सदर ठिकाणावर बिबी पोलीस तात्काळ हजर होउन सदर प्रकरणाची शहानिशा करून तात्काळ श्र्वानपथक व ठसेतज्ञ बोलावून नमुने घेण्यात आले

याबाबत सविस्तर असे की बीबी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या भुमराळा येथे दि १३ सप्टेंबर रोजीच्या रात्री ९.३० दरम्यान नारायन गोविंदराव सानप हे परीवारा सह जेवन करून झोपले असता रात्री १.३० वाजेच्या दरम्यान सानप यांना घरात मागील दरवाजा कापल्या जात असल्याचा आवाज आला त्यामुळे त्यांना जाग आली व ते जागी होऊन समोरचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला तर घराचे सर्व दरवाजे बाहेरुन लावलेले होते.अशा वेळी सानप यांनी मोबाईल पाहीला असता तो दिसला नाही म्हणून घरातुनच आरडा ओरड करुन शेजारील लोकांना आवाज दिले आवाज ऐकताच शेजारी जागी झाले व त्यानी दरवाजे उघडुन सानप व त्याच्या परीवाराला बाहेर आनले तोवर चोरटे हात साप करून पसार झाले होते.

**भुमराळा हे गाव डोगराच्या कुशीत बसलेले असून गावाच्या आजू बाजूला वनविभागाचे जंगल असून हे गाव मराठवाड्याच्या सिमेलगत असल्याने या गावात दरवर्षी अशाच प्रकारची घरफोडी चोरटे करतात भुमराळा आणी चोरी हे समीकरण च झाले आहे हे विशेष आता पोलीस या चोरीच्या प्रकरणाकडे कसे गांभीर्याने घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे**

सदर चोरट्यांनी घराच्या चॅनल गेट चे कुलुप तोड्डन जिण्या खालचा दरवाज्याला होल पाडुन कडी उघडुन घरात प्रवेश केला होता सानप यांनी घरातील वस्तुची पाहणी केली अस्ता बेडरुम मधील लोखंडी कपाटातुन ५.ग्रॅम सोन्याची अंगठी अंदाजे २५०००/रु ,५.ग्रॅम सोण्याचे झुंबर अंदाजे २५०००/रु,४.ग्रॅम सोण्याचे गहु मनी ३७ नग अंदाजे २००००/रू,लटकवेलेली पॅनट मधील नगदी रोख १००००/रु,बचत गटाचे ठेवलेले ५०००/रु,कपाटातले नगदी पाच -पाचशे च्या ६० नोटा ३००००/रु ,मोटार साईकल, कार ची चाबी व मुळ कागद पत्रे असे एकुन अंदाजे ११५०००/रु औवज अज्ञात चोरट्यांनी पसार केला अशी फिर्याद नारायण सानप यांनी बीबी पोलीस स्टेशनला दिली असतांना पोलीसांनी अप नं १३/२०२४ कलम ३३१(४),३०५ भारतीय न्याय संहीता २०२३ नुसार गुन्हा दाखल करून घटनेचा पंचनामा केला असून पूढील तपास ठाणेदार संदिप पाटील, सफो परमेश्र्वर शिंदे , पोहेकों अशोक अंभोरे, मापोको नितीन मापारी, नापोका अरुण सानप पोका यशवंत जैवळ पोकों रविंद्र बोरे पोका भारत ढाकणे हे करीत आहे.

# माकडाच्या हल्ल्यात आठवडाभरात सहा जण जखमी

## आलेगाव वन विभागांतर्गत दिग्रस बू.परिसरातील घटना

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर :** पातुर तालुक्यातील आलेगाव वनविभाग अंतर्गत येत असलेल्या वाडेगाव दिग्रस बु .परिसरात माकडाचा हैदोस सुरूच आहे. आठवडाभरात माकडांच्या हल्लयात सहा जण जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहे. सस्ती ते वाडेगाव मार्गाने ये जा करणाऱ्या काही जणांचे वाहनाचे नुकसान झाले,असून, वाहनांचेही नुकसान झाले आहे दिवसात पाच ते सहा जखमी झाल्याची घटना घडली आहे. दिग्रस बु. येथील रमेश ताले हल्लयात जखमी होऊन ते खाजगी दवाखान्यात उपचार घेत आहेत.तसेच शिवा ताले हे शेतातून पिकांची पाहणी करून दुचाकी ने घरी येत असताना त्यांच्या दुचाकीवर माकडाने हल्ला केल्याने एक जण जखमी झाल्याची घटना घडली.तसेच बुधवार रोजी सस्ती येथील मिस्त्री शेख या वेळी सामजिक युवा कार्यकर्ते आकाश गवई,सोनू पाटील आदींनी त्यांना मदत करून उपचारासाठी रुग्णालयात पाठविले असून, त्यांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले आहे.तसेच वाडेगाव कडे चारचाकी वाहन जाताना त्यांच्या गाडीवर माकडाने उडी घेऊन गाडीचा काच फुटून चालकाचे चेहऱ्याला छोट्या छोट्या काचाचा मार लागल्याची घटना घडली आहे.या परिसरातील माकडाचा बंदोबस्त करून परिसरा मधील माकड कळप घेऊन जावे अशी मागणी भारत कृषक समाजाचे चेअरमन प्रकाश मानकर,संचालक गोविंद पाटील रोकडे, सागर गवई, सावन गवई, दत्ता ताले,योगेश पाटील,विजय ताले, आदी युवकांकडून करण्यात आली आहे.



### आलेगाव वन विभागाचे दुर्लक्ष; ग्रामस्थ भयभीत

दिग्रस बू. परिसरात माकडांचा गेल्या आठवडा भरापासून हैदोस सुरूच आहे. त्यामुळे ग्रामस्थ भयभीत झाले असून, याकडे आलेगाव वन विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. याकडे संबंधित वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

# सिंदखेडराजा व संतनगरी शेगांव येथील मद्य व मास विक्री शहराच्या तीन किलोमीटर अंतरावर स्थलांतर करावे अन्यथा आमरण उपोषण

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील संपूर्ण भारतभर प्रसिद्ध असलेले जागतिक तीर्थक्षेत्र दर्जाचे जिजाऊं चे माहेरघर सिंदखेडराजा व विदर्भाची पंढरी म्हणून ओळख अलेले संत गजानन महाराज शेगाव या दोन्ही ठिकाणच्या भक्त गणांना दारुड्या लोकांपासून भक्ताच्या भावना दुखत असल्याने देशी व विदेशी दारूचे दुकाने व या दोन्ही शहरातील मास विक्रीची दुकाने या दोन्ही शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर या सर्व दुकानांना विक्री करण्यास व मध्य विकण्यास शासनाने परवानगी द्यावी तसं न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे दिनांक १९ सप्टेंबर पासून आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा बीबी येथील सामाजिक कार्यकर्ते सुनिता श्री किसन भांड लता सखाराम धाईत जिजाबाई भगवान सदावर्ते राहणार बीबी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना इशारा देण्यात आला याबाबत सविस्तर असे की संपूर्ण भारतातून नव्हे तर संपूर्ण जगातील लोक छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोळ व राजमाता जिजाऊ चे माहेरघर असलेले सिंदखेडराजा येथे पर्यटन म्हणून राजवाड्याला पाण्यासाठी पर्यटक येत असतात.

तसेच विदर्भाची पंढरी म्हणून ओळख असलेले संत गजानन महाराज शेगाव येथेही मोठ्या प्रमाणे भक्ती भावाने गजानन महाराजांचे भक्त लाखोच्या संख्येने येत असतात.

मात्र सिंदखेडराजा व शेगाव मध्ये शासनमान्य असलेले देशी दारूचे दुकान व विदेशी दारूचे दुकान रोडवरच असल्याने मोठ्या प्रमाणात दारू पिणाऱ्या लोकांचा त्रास हा पर्यटनासाठी आलेल्या व दर्शनासाठी आलेल्या भक्तगणांना मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याने व तसेच मास विक्रीचे दुकाने सुद्धा सिंदखेडराजा व शेगांव मोठ्या प्रमाणात असल्याने या मास विक्रीमुळे दर्शनासाठी आलेल्या भक्तगणांची मोठ्या प्रमाणात विटंबना होत असून भक्त गणनाचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे त्यामुळे भक्तगणाचा नाराजीचा सुरू वाढत आहे.

तरी सिंदखेडराजा व शेगाव येथील पर्यटन क्षेत्राच्या व सिंदखेडराजा या दर्जा असलेल्या भक्त गणनाच्या भावना दुखावल्या जात असल्याने या दोन्ही शहरातील शासन मान्यता देशी विदेशी दारूचे दुकान शहरात होत असलेली मास विक्री कायमस्वरूपी बंद करून या दोन्ही शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर स्थलांतर करावे अन्यथा १९ तारखेपासून जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा या ठिकाणी उपोषला बसणार असल्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे

## विविध वृत्त...

### खामगावात गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर रंगीत तालीमसह पोलिसांचा रूट मार्च



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर व आगामी सन उत्सवानिमित्त आज खामगांव शहरात रूट मार्च काढण्यात आला. तसेच विसर्जन मिरवणुकीमध्ये कुठलाही अडथळा येऊ नये.यासाठी स्थानिक प्रशासनाच्या वतीने विसर्जन मिरवणूक मार्गाची पाहणी करण्यात आली.गणेश विसर्जन शांततेत पार पडावे, यासाठी स्थानिक प्रशासनाने गणेश विसर्जन मिरवणुकीच्या मार्गाची पाहणी केली. तसेच कर्मचाऱ्यांना त्या संदर्भात आदेश देण्यात आले. कुठलाही गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता म्हणून पोलिसांनी आज रूट मार्च सह प्रात्यक्षिके व मार्गाची पाहणी केली आहे.

### धनगर आरक्षणासाठी युवकाचे शोले आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव :** धनगर आरक्षण संदर्भात पंढरपूर येथे सुरु असलेल्या धनगर बांधवांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी शेलगाव देशमुख येथे युवकाने टावरवर चढून शोले आंदोलन आहे.

महाराष्ट्रामध्ये धनगर समाज हा अतिशय गरीब असून मेंढपाळ व्यवसाय करून आपला कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. घटनेनुसार धनगर समाजाला एसटीमध्ये आरक्षण देण्यात आले आहे. मात्र सरकारकडून त्याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे धनगर समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी लोकशाही मार्गाने व शांततेने गेल्या अनेक वर्षापासून आंदोलन निवेदन व मागणी करण्यात येत आहे. मात्र सरकार गंभीरतेने घेत नसून धनगर आरक्षणाकडे दुर्लक्ष केले आहे.त्यामुळे धनगर समाज बांधवांचे मुले मुली विविध योजनेपासून वंचित राहत असून समाजाला आरक्षण मिळावे यासाठी विजय गायके, दीपक बोहर्हाडे, योगेश गणेश माऊली मेहकरणवार हे आपले सहा बांधव एस टी पंढरपूर येथे उपोषण करीत आहेत.या उपोषणाला पाठिंबा म्हणून दि. १५ सप्टेंबर ला मेहकर तालुका व बुलढाणा जिल्हा धनगर समाजाच्या वतीने गजानन बोरकर यांनी शेलगाव देशमुख येथील बि. एस. एन. एल च्या टावरवर चढून शोले आंदोलन करून पाठिंबा देत धनगर समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीकडे लक्ष वेधले.

### २२ वर्षापासून फरार आरोपीस अटक



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** खामगाव येथील न्यायालयाने २००२ रोजी शिक्षा सुनावली होती. तेव्हापासून सदर आरोपी पोपट भाऊसाहेब खोले हा फरार होता.या आरोपीचा शोध पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे, अपर पोलीस अधीक्षक थोरात, महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या आदेशाने घेत दि.१४ सप्टेंबर २०२४ रोजी आरोपीस पोलीस स्टेश्र्न काशीगाव मीराभाईन्दर आयुक्तालय येथुन ताब्यात घेत अटक केली आहे. घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार हिवरखेड पोलीस स्टेशन येथे सदर आरोपी पोपट भाउसाहेब खोले उर्फ बाळु बाबुराव काळे रा.राक्षसभवन ता.पाटोडा जि बीड पो. स्टे. शिरुर कासार विरुद्ध कलम ३०२,२०१ गुन्हा दाखल होता. याबाबत खामगाव न्यायालयाने २००२ रोजी शिक्षा सुनावली होती. ती हाय कोर्टनी कायम ठेवली होती. तेव्हापासून सदर आरोपी हा फरार होता. सदर आरोपी काशीगाव पोलिस स्टेशन हद्दित असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी आरोपीचा शोध घेवून त्यास ताब्यात घेतले आहे.ही कार्यवाही पथकातील पोउपनि प्रताप बाजड, बकाले, टेकाळे, वारुळे यांनी केली.

### लातूर जिल्हा रुग्णालयाचा रखडलेला प्रश्न मार्गी लावावा

**लातूर/प्रतिनिधी :**धाराशिव जिल्ह्यात नियोजित विविध कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे लातूर विमानतळावर उतरले असता त्यांचे स्वागत जिल्हाधिकारी यांनी केले. जेवढा वेळ ते विमानतळावर होते त्या वेळेत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी लातूर जिल्हा रुग्णालय या महत्वाच्या आणि रखडलेल्या विषयाची सविस्तर माहिती देत त्यांना रुग्णालय संदर्भात माझं लातूर परिवार आणि सर्वसामान्य नागरीकांच्या तीव्र भावना अवगत करून दिल्या.

## पोहरादेवी येथे नंगारा व मंदिर उद्घाटन सोहळ्याची जय्यत तयारी

दैनिक आपला विदर्भ



**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर येथे १७ सप्टेंबरला आढावा सभा बुलढाणा. बंजारा समाजाची काशी पोहरादेवी येथील नंगारा म्युझियम सोहळ्याचे लोकापर्ण व श्री.संत सेवालाल महाराज यांचे सुरु असलेले मंदिराचे उद्घाटन करण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे दि.२६ सप्टेंबर रोजी येणार आहेत.हा सोहळा भव्यदिव्य व्हावा, यासाठी जय्यत तयारी केली जात असून याबाबत मेहकर येथे मंगळवार दि.१७ सप्टेंबर रोजी आढावा सभा आयोजित केली आहे.

या आढावा सभेला बंजारा समाज बांधवांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरादेवी येथे महाराष्ट्रातील बंजारा समाजाचे लोकप्रिय नेते तथा कॅबिनेट मंत्री संजय भाऊ राठोड यांच्या नेतृत्वाखाली बंजारा समाजाचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील नंगारा म्युझियमचे लोकार्पण सोहळा व श्री.संत सेवालाल महाराज यांचे सुरु असलेले मंदिराचे उद्घाटन करण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे दि.२६ सप्टेंबर रोजी येणार आहेत. तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व महाराष्ट्र शासनातील अनेक मंत्री या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. तसेच भारतातील इतर राज्यातून सुद्धा अनेक राजकीय व प्रशासकीय क्षेत्रातील दिग्गज या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्याला देशातून जवळपास १५ लाखापेक्षा अधिक भाविक उपस्थित राहणार असल्याचे अंदाज आहे.

तरी या संदर्भात पूर्व विदर्भात आढावा बैठक घेण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे बंजारा समाजाचे लोकप्रिय नेते तथा कॅबिनेट मंत्री संजयभाऊ राठोड व त्यांचे खाजगी सचिव डॉ. विशाल राठोड यांच्या उपस्थितीत तसेच राजगड संस्थांचे महंत रायसिंग महाराज,टेंबुरखेड संस्थांचे महंत हिम्मत महाराज व देऊळगाव साखरशा संस्थांचे महंत रामदास महाराज,श्री संत भानुदास महाराज संस्थान मोहना चे विश्वस्त जानकिराम महाराज हे सुद्धा या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत. याबाबत मेहकर येथे दि. १७ सप्टेंबर २०२४ ला कृषी वैभव लॉन या ठिकाणी दुपारी १.३० वाजता आढावा सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सर्व बंजारा समाज बांधवांनी या आढावा सभेला मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### हवाई प्रवाशांचा संताप! ६ तासांच्या विलंबानंतर मुंबई-दोहा इंडिगो विमान रद्द

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील इंडिगो एअरलाईन्सबाबत सातत्याने नवनवीन अपडेट्स समोर येत असतात. अशातच आज इंडिगो विमानतळावर हवाई प्रवाशांचा मोठा खोळंबा झाल्याची माहिती मिळत आहे. मुंबइहून दोहा-कतारला जाणारे इंडिगोचे विमान तब्बल ६ तासानंतर रद्द करण्यात आले. त्यामुळे या विमानाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी इंडिगोबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे ३ वाजून ५५ मिनिटांच्या सुमारास उड्डाण करणार होते. मात्र विमानात झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे हे विमान ६ तासांनंतर रद्द करण्यात आले. या विमानात २०० ते ३०० प्रवासी होते. प्रवाशांना विमानात चढवल्यानंतर विमान तासनतास विमानतळावरच उभे होते. सुमारे ५ तास प्रवाशांनी विमान उड्डाण होण्याची वाट पाहिली तसेच त्यांना विमानातून उतरण्याची परवानगी देखील दिली नव्हती. परंतु प्रवाशांचा संताप वाढल्यावर क्रू मेंबर्सनी त्यांना फ्लाइटमधून उतरण्याची परवानगी दिली आणि इमिग्रेशन वेटिंग एरियामध्ये नेले. तांत्रिक बिघाडामुळे उड्डाण रद्द करण्यात आल्याचे इंडिगोने म्हटले. प्रवाशाने असा दावा केला की, या काळात त्याला पाणी आणि अन्नही मिळाले नाही.

### संविधान मंदिराचे उपराष्ट्रपती यांच्या हस्ते उद्घाटन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जळगांव जामोद येथील शासकीय. औ. प्र. संस्था येथे उभारण्यात आलेल्या संविधान मंदिराचे ऑनलाईन पध्दतीने उपराष्ट्रपती जगदीश धनखड यांच्याहस्ते आज दि. १५ सप्टेंबर रोजी उद्घाटन करण्यात आले. सदर कार्यक्रमास जळगांव जामोद मतदार संघाचे आमदार डॉ. संजय कुटे,बुलडाणा अर्बनचे संचालक किशोर केला, प्रमोद भंसाली, आसलगावचे सरपंच इंगळे,डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्तीगृह अधिक्षक इंगोले, विनीत भंसाली,डाबरे, सुरेश दातीर, आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या प्रसंगी आमदार कुटे यांनी विद्यार्थ्यांना अमुल्य मार्गदर्शन करताना संविधानचे महत्व समजावून सांगितले. तसेच या प्रसंगी विद्यार्थ्यांनी काढलेले चित्रकला संविधान स्पर्धेची पाहणी केली व संस्थेत तयार केलेल्या संविधान मंदिराची पहाणी करुन कौतुक केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे प्राचार्य विनोद पायघन यांनी केले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राजू कंडारकर यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे यस्शतीतेसाठी वरीष्ठ निदेशक ओंकार मुडांले, हवालदार, एम.आर. दाभाडे,पी.आर दाभाडे,ताडे,मेहेंगे, तानकर, व्यवहारे,आकोटकार, भामोद्रे धेंडुदे तथा इतर कर्मचारी वृंदानी अथक परीश्रम घेतले. तसेच या पूर्वी दि.१२ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर संस्थेत विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन संविधान महोत्सव साजरा करण्यात आला. अशा प्रकारे मोठया उत्साहात संविधान मंदिराचे लोकाअर्पन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमामुळे संविधाना प्रति वेगळी आत्मियता विद्यार्थ्यामध्ये निमार्ण झाली.

### वडार समाजाच्या विविध मागण्यासाठी ॲड. तुकाराम माने यांचे अमरण उपोषण

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील वडार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दि. १४ सप्टेंबर २०२४ पासून लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर अमरण उपोषण खालील मागण्यासाठी ऍड. तुकाराम माने करीत आहेत.

शासनाने त्वरीत खालील मागण्या मान्य कराव्यात १. कै. मारुती चव्हाण वडार समाज आर्थिक विकास महामंडळाची तात्काळ अमलबजावणी करावी, २. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी वडार समाजाच्या १०० विद्यार्थ्यांचे स्वतंत्र्य वस्ती गृह सुरू करावे, ३. रोहिणी अयोगाच्या केंद्र शासनाला केलेल्या शिफारशी अनुसार वडार समाजाला ९ टक्के आरक्षण लागू करावे. ४. जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी १९६१ च्या पुराव्याची अट्ट रद्द करावी.५. नॉन क्रिमीलियरची अट रद्द करावी. ६. वडार वस्ती सुधारण्यासाठी स्वतंत्र्य अर्थिक तरतुद करण्यात यावी. ७. वडार समाजातील मजूर संस्थांना प्राध्यान्याने शासकीय कंत्राटाची कामे देण्याची तरदूद करावी. ८. वडार समाजातील स्पर्धा परिक्षार्थी व तसेच नव उद्योजकांना विशेष आर्थिक साहय्याची तरतुद करण्यात यावी. ९. व्यवसायिक शिक्षणासाठीची राज्य शासनाने बंद केलेली शिष्यवृत्त पुन्हा सुरू करावी. १०. बी.आर. इदाते समितीच्या आव्हालाची अमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदर मागण्या शासनाने त्वरीत मंजूर कराव्यात मागण्या मंजूर होई पर्यंत अमरण उपोषण मागे घेणार नाही. असे प्रसिद्ध पत्रकाद्वारे कळविले आहे.

## सागर शांडिल्य यांचा पुणे येथे सत्कार

दैनिक आपला विदर्भ



**रिसोड/प्रतिनिधी :** येथील वेदमूर्ती सागर चंद्रकांत शांडिल्य यांनी अयोध्या येथे वेदांनुष्ठान विनासंभावना केल्यामुळे श्री सद्गुरू ग्रुप पुणे यांच्यावतीने पुणे येथे स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

येथील रहिवासी असलेले व सागर महाराज म्हणून प्रसिद्ध असलेले वेदमूर्ती सागर चंद्रकांत शांडिल्य यांनी अयोध्या येथे प्रभू श्रीराम यांचे मंदिर पुननिर्माण कार्य यशस्वी संपन्न होण्याकरिता तसेच प्रभू श्रीराम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा कार्य यशस्वी संपन्न होण्यासाठी वेदानुष्ठान विना संभावना केल्यामुळे श्री सद्गुरू ग्रुप पुणे यांच्या वतीने आयोजित श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास अयोध्या यांच्या अनुमतीने वेद अनुष्ठान आणि सेवा योजना (प्रकल्प) अयोध्या यांच्या अनुमतीने वेदमूर्ती सागर चंद्रकांत शांडिल्य यांचा श्री सद्गुरू ग्रुप पुणे यांच्यावतीने आयोजित कार्यक्रमांमध्ये सागर शांडिल्य यांचा स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र व श्रीराम प्रभूची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला वेदमूर्ती सागर सांडिले हे मागील सात वर्षापासून यज्ञिकी सेवा कार्यात आपला सहभाग देत आहेत श्री सद्गुरू ग्रुप पुणे या संस्थेने आयोजित केलेल्या वेद अनुष्ठान उपक्रम त्यांनी सहभाग दिला असून प्रभू श्रीराम यांची मंदिर पुनर्निर्माण कार्य यशस्वी संपन्न होण्यासाठी वेदानुष्ठान विना संभावना केल्यामुळे सागर शांडिल्य हे सद्गुरू ग्रुप पुणे संस्थेचे वेद सेवक आहेत तसेच पुणे संस्थेची सक्रिय वेदसेवक असल्यामुळे त्यांचा सन्मान करण्यात आला. प पु गोविंदगिरी महाराज कोषाध्यक्ष श्रीराम जन्मभूमी अयोध्या,प पु नागेश्र्वर शास्त्री द्रविड ( बनारस) काशी, वे मु श्री प्रकाश दंडगे गुरुजी ऋग्वेद घनपाठी अध्यक्ष निवड समिती,मा श्री चंपतराय बंसल महासचिव श्रीराम जन्मभूमी अयोध्या, श्री यशवंत कुलकर्णी संस्थापक अध्यक्ष पुणे यांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत सागर महाराज शांडिल्य यांचा सत्कार करण्यात आला.

## दिग्रस मध्ये राहुल गांधी यांच्या आरक्षण विरोधी वक्तव्याचा निषेध

दैनिक आपला विदर्भ

**दिग्रस/प्रतिनिधी :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी परदेशात जाऊन आरक्षण संपवण्याबाबत केलेल्या संविधान विरोधी वक्तव्याचा निषेध करण्यासाठी शिवसेना, भाजप, रीपाईच्या वतीने दिग्रस येथे आज शनिवार दिनांक १४ सप्टेंबर २०२४ रोजी दिग्रस शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर आंदोलन करण्यात आले.

दिग्रस मध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून व अभिवादन करून निषेध आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत भारत विरोधी आरक्षण विरोधी केलेल्या वक्तव्याचा शिवसेना, भारतीय जनता पक्ष व रीपाई पक्षच्या वतीने निषेध करण्यात आला. यावेळी आरक्षण आमच्या हक्काचं नाही, कुणाच्या बापाचं. राहुल गांधी मुर्दाबाद, राहुल गांधी हाय हाय, आरक्षणाला विरोध करणारा राहुल गांधीचा निषेध असो, अशा घोषणा देऊन राहुल गांधी यांचे चित्र असलेल्या फलकांवर चपलाने मारण्यात आले व तीव्र शब्दात निषेध नोंदवण्यात आला. एकीकडे संविधान वाचवण्याचा आव आनणाऱ्या राहुल गांधीचा खरा चेहरा समोर आला असून आरक्षण रद्द करून भारतात गृहयुद्ध छेडण्याचा राहुल गांधी यांचा मानस असल्याचे यावेळी सांगण्यात आले. त्यामुळे अशा देशद्रोही दुतोंडी राहुल गांधींवर देशवासीयांनी विश्र्वास करू नये असेही आव्हान यावेळी करण्यात आले.

यावेळी शिवसेना, भाजप, रिपाई पक्षाचे राजकुमार वानखडे, उत्तममामा ठवकर, डॉ. संदीप दुधे, प्रमोद बनगिनवार, विवेक बनगिनवार, संजय कूकडी, रामदास पद्मावार, अभय इंगळे, दीपक कोठारी, मनोज टेवरे, किशोर साबू, मनोज राठोड, कैलास राठोड, संजय इकडे, अजय भोयर, संदीप रत्नपारखी, नितीन सोनुलकर, गोपाल राठोड रमाकांत काळे, सुधीर रत्नपारखी, संजिव चोपडे, संजीवनी शेरे, वर्षां निगोट, कल्पना पवार, माला लोखंडे,




सारिका विरेकर, जयप्रकाश राठी, श्याम जामकर, दीपक तोडासाम, तसलीम खान आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.